असा. क्र. ४ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी ४, २००८/पौष १४, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

पृष्ठे

**सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.—** मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करण्यासाठी अधिनियम .. .. .. .. ८-११

दिनांक २ जानेवारी २००८ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे :—

**अ. मा. शिंदेकर,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

---

### सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३.

( मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ४ जानेवारी २००८ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम. )

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

**ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांत आणखी सुधारणा करणे इष्ट आहे ;

**त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या अठ्ठावन्नाव्या वर्षी, याद्वारे पुढील अधिनियम करण्यात येत आहे :-

प्रकरण एक

**प्रारंभिक**

संक्षिप्त नाव.

**१.** या अधिनियमास महाराष्ट्र महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, २००७ असे म्हणावे.

प्रकरण दोन

**मुंबई महानगरपालिका अधिनियम याची सुधारणा**

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम १६ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १६ मधील, पोट-कलम (१) मधील खंड (अ) नंतर, पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— १८८८ चा मुंबई ३.

" (अअ) कलम १८-१अ अन्वये पदावरून दूर करण्यात आली असेल आणि अशा प्रकारे पदावरून दूर करण्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा काळ लोटला नसेल; किंवा ".

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ मध्ये नवीन कलम १८-१अ समाविष्ट करणे.

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १८ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

पालिका सदस्य पदावरून काढून टाकण्यास पात्र ठरणे.

" **१८-१अ.** (१) जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या चालू पदावधीमध्ये किंवा चालू पदावधीच्या लगतपूर्वीच्या पदावधीमध्ये, पालिका सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये बजावत असताना, कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तणुकीबद्दल दोषी ठरला असेल तर राज्य शासनास, स्वतःहून किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरून, त्या सदस्यास पदावरून दूर करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही पालिका सदस्यास दूर करण्याची शिफारस करणारा कोणताही ठराव, महानगरपालिकेकडून आणि पदावरून दूर करण्याचा कोणताही आदेश राज्य शासनाकडून, तो ठराव किंवा आदेश, ज्या कोणत्याही पालिका सदस्याशी संबंधित असेल त्यास अशी शिफारस किंवा, यथास्थिती, आदेश का काढण्यात येऊ नये, याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज संमत करण्यात येणार नाही :

परंतु असे की, महानगरपालिकेला त्याबाबतीत आवश्यक कारवाई करण्याकरिता एक महिन्याचा कालावधी दिल्याखेरीज, राज्य शासन स्वतःहून पालिका सदस्याला दूर करण्याचा कोणताही आदेश काढणार नाही.

(३) ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये आदेश दिला आहे, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, अशा पालिका सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि असा निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास,याद्वारे, देण्यात येत आहे.".

प्रकरण तीन

## मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याची सुधारणा

१९४९ चा मुंबई ५९. **४.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ (यात यापुढे ज्याचा निर्देश " प्रांतिक महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम १३ ऐवजी, पुढील कलम दाखल करण्यात येईल :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ मध्ये कलम १३ ऐवजी नवीन कलम दाखल करणे.

" **१३.** (१) (अ) जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या चालू पदावधीमध्ये किंवा चालू पदावधीच्या लगतपूर्वीच्या पदावधीमध्ये, पालिका सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये बजावत असताना, कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तणुकीबद्दल दोषी ठरला असेल तर, राज्य शासनास, स्वतःहून किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरून, त्या सदस्यास पदावरून दूर करता येईल. पालिका सदस्य पदावरून काढून टाकण्यास पात्र ठरणे.

(ब) जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य या नात्याने आपली कर्तव्ये पार पाडण्यास असमर्थ झाला आहे, असे राज्य शासनाचे मत असेल तर, राज्य शासनास, एकूण पालिका सदस्यांपैकी कमीत कमी तीन-चतुर्थांश पालिका सदस्यांनी मत देऊन पाठिंबा दिलेल्या, महानगरपालिकेच्या शिफारशीवरून, त्या पालिका सदस्याला पदावरून दूर करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही पालिका सदस्यास दूर करण्याची शिफारस करणारा कोणताही ठराव महानगरपालिकेकडून आणि पदावरून दूर करण्याचा कोणताही आदेश राज्य शासनाकडून, तो ठराव किंवा आदेश, ज्या कोणत्याही पालिका सदस्याशी संबंधित असेल त्यास, अशी शिफारस किंवा यथास्थिती, आदेश का काढण्यात येऊ नये, याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज संमत करण्यात येणार नाही :

परंतु असे की, महानगरपालिकेला त्याबाबतीत आवश्यक कारवाई करण्याकरिता एक महिन्याचा कालावधी दिल्याखेरीज, राज्य शासन स्वतःहून पालिका सदस्याला दूर करण्याचा कोणताही आदेश काढणार नाही.

(३) ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये आदेश दिला आहे, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, अशा पालिका सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि असा निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास, याद्वारे देण्यात येत आहे.

(४) या कलमान्वये पालिका सदस्याला काढून टाकण्याबाबत आणि निरर्ह ठरविण्याबाबत कोणतीही शंका किंवा विवाद उद्‌भवल्यास, अशा पालिका सदस्यास आणि महानगरपालिकेच्या विनंतीवरून आयुक्तास न्यायाधीशाकडे त्याचा निर्देश (reference) करता येईल.".

**५.** प्रांतिक महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४०५ मध्ये, खंड (१) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ याच्या कलम ४०५ ची सुधारणा.

" (१-अ) कलम १३ अन्वये पालिका सदस्यास काढून टाकण्यासंबंधी आणि निरर्ह ठरविण्यासंबंधी ;".

प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याची सुधारणा

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ मध्ये नवीन कलम १९अ समाविष्ट करणे.

६. नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ याच्या कलम १९ नंतर पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

पालिका सदस्य पदावरून काढून टाकण्यास पात्र ठरणे.

" **१९अ.** (१) जर कोणताही पालिका सदस्य, पालिका सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या चालू पदावधीमध्ये किंवा चालू पदावधीच्या लगतपूर्वीच्या पदावधीमध्ये, पालिका सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये बजावत असताना, कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तणुकीबद्दल दोषी ठरला असेल तर, राज्य शासनास, स्वतःहून किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरून, त्या सदस्यास पदावरून दूर करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही पालिका सदस्यास दूर करण्याची शिफारस करणारा कोणताही ठराव महानगरपालिकेकडून आणि पदावरून दूर करण्याचा कोणताही आदेश राज्य शासनाकडून, तो ठराव किंवा आदेश ज्या कोणत्याही पालिका सदस्याशी संबंधित असेल त्यास, अशी शिफारस, किंवा यथास्थिती आदेश का काढण्यात येऊ नये, याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज संमत करण्यात येणार नाही :

परंतु असे की, महानगरपालिकेला त्याबाबतीत आवश्यक कारवाई करण्याकरिता एक महिन्याचा कालावधी दिल्याखेरीज, राज्य शासन स्वतःहून पालिका सदस्याला दूर करण्याचा कोणताही आदेश काढणार नाही.

(३) ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये आदेश दिला आहे, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, अशा पालिका सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि असा निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास, याद्वारे देण्यात येत आहे.

(४) या कलमान्वये पालिका सदस्याला काढून टाकण्याबाबत आणि निरर्ह ठरविण्याबाबत कोणतीही शंका किंवा वाद उद्‌भवल्यास, अशा पालिका सदस्यास, आणि महानगरपालिकेच्या विनंतीवरून आयुक्तास तो, जिल्हा न्यायाधीशाकडे त्यांचा निर्देश (reference) करता येईल.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ३

रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शुक्रवार, जानेवारी ४, २००८/ पौष १४, शके १९२९

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

# भाग आठ

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Municipal Corporations (Second Amendment) Act, 2007 (Mah. Act No. III of 2008), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

A. M. SHINDEKAR,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

## MAHARASHTRA ACT No. III OF 2008.

*[First published, after having received the assent of the Governor, in the "Maharashtra Government Gazette", on the 4th January 2008].*

An Act further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, and the City of Nagpur Corporation Act, 1948.

Bom. III of 1888. Bom LIX of 1949. C.P. and Berar II of 1950.

WHEREAS it is expedient further to amend the Mumbai Municipal Corporation Act, the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949, and the City of Nagpur Corporation Act, 1948, for the purposes hereinafter appearing ; it is hereby enacted in the Fifty-Eighth Year of the Republic of India as follows :—

### CHAPTER I

PRELIMINARY

**1.** This Act may be called the Maharashtra Municipal Corporations (Second Amendment) Act, 2007. Short title.



[ किंमत : रुपये १५.०० ]

## CHAPTER II

### AMENDMENTS TO THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT

Amendment of section 16 of Bom. III of 1888.

**2.** In section 16 of the Mumbai Municipal Corporation Act (hereinafter referred to as "the Mumbai Corporation Act"), in sub-section (*1*), after clause (*a*), the following clause shall be inserted, namely :— Bom. III of 1888.

"(*aa*) has been removed from the office under section 18-1A and five years have not elapsed from the date of such removal; or.".

Insertion of section 18-1A in Bom. III of 1888.

**3.** After section 18 of the Mumbai Corporation Act, the following section shall be inserted, namely :—

Liability of Councillor to removal from office.

"**18-1A.** (*1*) The State Government may, on its own motion or on the recommendation of the Corporation, remove any Councillor from office, if such Councillor has been guilty of any misconduct in the discharge of his duties or of any disgraceful conduct, during his current term of office or immediately preceding term of office as a Councillor.

(*2*) No resolution recommending the removal of any Councillor for the purpose of sub-section (*1*) shall be passed by the Corporation and no order of removal shall be made by the State Government, unless the Councillor to whom it relates has been given a reasonable opportunity of showing cause why such recommendation or order, as the case may be, should not be made :

Provided that, no order of removal of councillor shall be made by the State Government on its own motion, unless the Corporation is given one month's time for taking necessary action in the matter.

(*3*) In every case in which the State Government makes an order under sub-section (*1*), the Councillor shall be disqualified for being a Councillor, or from becoming a Councillor, or a Councillor or a member of any other local authority, for a period of five years from the date of such order, unless the State Government relieves him of the disqualification by an order which it is hereby empowered to make.".

## CHAPTER III

### AMENDMENTS TO THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949

Substitution of section 13 of Bom. LIX of 1949.

**4.** For section 13 of the Bombay Provincial Municipal Corporations Act, 1949 (hereinafter referred to as "the Provincial Corporations Act"), the following section shall be substituted, namely :— Bom. LIX of 1949.

Liability of Councillor to removal from office.

"**13.** (*1*) (*a*) The State Government may, on its own motion or on the recommendation of the Corporation, remove any Councillor from office, if such Councillor has been guilty of any misconduct in the discharge of his duties, or of any disgraceful conduct, during

his current term of office or immediately preceding term of office as a Councillor.

(*b*) The State Government may, on the recommendation of the Corporation supported by the vote of not less than three-fourths of the whole number of Councillors, remove any councillor from office, if such Councillor has, in the opinion of the State Government, become incapable of performing his duties as a Councillor.

(*2*) No resolution recommending the removal of a Councillor for the purposes of sub-section (*1*) shall be passed by a Corporation and no order shall be made by the State Government, unless the Councillor to whom it relates has been given a reasonable opportunity of showing cause why such recommendation or order, as the case may be, should not be made :

Provided that, no order of removal of councillor shall be made by the State Government on its own motion, unless the Corporation is given one month's time for taking necessary action in the matter.

(*3*) In every case in which the State Government makes an order under sub-section (*1*), the Councillor shall be disqualified for being a Councillor, or from becoming a Councillor, or a Councillor or member of any other local authority, for a period of five years from such date as may be specified in such order, unless the State Government relieves him of the disqualification by an order which it is hereby empowered to make.

(*4*) If any doubt or dispute arises as to the removal and disqualification of a councillor under this section, such Councillor may, and at the request of the Corporation, the Commissioner may, make reference to the Judge.".

Amendment of section 405 of Bom. LIX of 1949.

**5.** In section 405 of the Provincial Corporation Act, after clause (*1*), the following clause shall be inserted, namely :—

"(*1A*) regarding removal and disqualification of a Councillor under section 13 ; ".

## CHAPTER IV

### AMENDMENTS TO THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948

C.P. and Berar II of 1950.

Insertion of section 19A in C.P. and Berar II of 1950.

**6.** After section 19 of the City of Nagpur Corporation Act, 1948, the following section shall be inserted, namely :—

Liability of Councillor to removal from office.

"**19A.** (*1*) The State Government may, on its own motion or on the recommendation of the Corporation, remove any Councillor from office, if such Councillor has been guilty of any misconduct in the discharge of his duties or of any disgraceful conduct, during his current term of office or immediately preceding term of office as a Councillor.

(*2*) No resolution recommending the removal of any Councillor for the purposes of sub-section (*1*) shall be passed by the

Corporation and no order of removal shall be made by the State Government, unless the Councillor to whom it relates has been given a reasonable opportunity of showing cause why such recommendation or order, as the case may be, should not be made :

Provided that, no order of removal of councillor shall be made by the State Government on its own motion, unless the Corporation is given one month's time for taking necessary action in the matter.

(*3*) In every case in which the State Government makes an order under sub-section (*1*), the Councillor shall be disqualified for being a Councillor, or from becoming a Councillor, or a Councillor or member of any other local authority, for a period of five years from the date of such order unless the State Government relieves him of the disqualification by an order which it is hereby empowered to make.

(*4*) If any doubt or dispute arises as to the removal and disqualification of a Councillor under this section, such Councillor may, and at the request of the Corporation, the Commissioner may, make reference to the District Judge.".

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई